बीड- महाराष्ट्र | साप्ताहिक | वर्षे 1 ले | अंक 11 वा | बुधवार, दि. 15 ते 21 जानेवारी 2025 | टीसी- एमएएचएमआर/2023/52253 | पाने 4 | किंमत 2 रु |
BEED - MAHARASHTRA VICKELY | VOL 1 | issue 11 | tuesday, 15 To 21 Jan 2025 | TC- MAHMAR/2023/52253 | PAGE 4 | Rs. 2 रु |

जाहीरात व
बातम्यांसाठी संपर्क
+91 97635 21855

सा. बीड गदर
नि:पक्षपाती लेखणीचा कणखर बाणा
संपादक : ज्ञानेश्वर लंगे मो. 9763521855

## पिंपरखेडच्या तरूणाची संभाजीनगर येथे हत्या

वडवणी : छत्रपती संभाजीनगर येथे पदवीचे शिक्षण घेणाऱ्या बीसीएसच्या विद्यार्थ्याची फ्लॅटमध्ये गळा चिरून हत्या करण्यात आल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. प्रदीप विश्वनाथ निपटे (वय १९) रा. पिंपरखेड ता. वडवणी, जि. बीड या विद्यार्थ्याची अज्ञात हल्लेखोरांनी निघृण हत्या केली



आहे. प्रदीपच्या हत्येमागे महाविद्यालयात झालेल्या वादाची पार्श्वभूमी असल्याचा प्राथमिक संशय पोलिसांकडून व्यक्त केला जात आहे. शनिवारी महाविद्यालयातील काही मुलांसोबत किरकोळ कारणावरून वाद झाला होता. या वादावेळी 'तू एकटक का पाहतोस?, कॉलर का उडवतोस? अशा कारणांवरून वाद होऊन हाणामारी झाली होती. संक्रांतीच्या रात्री प्रदीपचे मित्र बाहेर गेले असताना मारेकऱ्यांनी फ्लॅटमध्ये घुसून त्याची गळा चिरून हत्या केली. ही धक्कादायक घटना मंगळवारी रात्री साडेअकरा वाजता उस्मानपुऱ्यात उघडकीस आली. प्रदीप मूळचा बीड जिल्ह्यातील वडवणी तालुक्यातील पिंपरखेड येथील असून देवगिरी महाविद्यालयात बीसीएसच्या प्रथम वर्षात शिक्षण घेत होता. तो आपल्या एका मावसभावासह अन्य तीन मित्रांसोबत भाजीवालीबाई पुतळ्याजवळील एका अपार्टमेंटमध्ये भाड्याने राहत होता. मंगळवारी सर्वजण महाविद्यालयातून फ्लॅटवर परतले होते. सायंकाळी त्याचा भाऊ आणि अन्य मित्र बाहेर गेले होते, परंतु प्रदीप मात्र फ्लॅटवर थांबला होता. मंगळवारी रात्री १० वाजता त्याचे भाऊ आणि मित्र परतले, तेव्हा त्यांनी प्रदीपला गळा कापलेल्या आणि रक्तबंबाळ अवस्थेत मृत पाहिले. या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण पसरले असून पोलिसांनी गुन्ह्याचा तपास सुरू केला आहे. हत्येमागील कारणांचा शोध घेण्यासाठी पोलिसांकडून अधिक सखोल चौकशी केली जात आहे.

# अखेर आकाला मकोका

## वाल्मीक कराड हत्या प्रकरणात आज न्यायालयात

बीड प्रतिनीधी

संतोष देशमुख हत्या प्रकरणात सर्व आरोपींना 'मकोका' लावण्यात आला असला तरी तपास यंत्रणांनी वाल्मीक कराडवर मकोका लावला नव्हता. यावरून प्रचंड टीका झाली. विरोधकांनी सरकारला लक्ष्य केलं. तसेच संतोष देशमुख यांच्या कुटुंबीयांनी देखील आंदोलन केलं. अखेर आज वाल्मीक कराडवर मकोका लावण्यात आला. यानंतर कराड समर्थकांनी परळीत आंदोलन केलं. या आंदोलनात वाल्मीक कराडची आई पारूबाई कराड या देखील आंदोलनासाठी बसल्या होत्या. आंदोलनावेळी त्यांना भोवळ आल्यानंतर त्यांच्यावर उपचार सुरू करण्यात आले. याआधी वाल्मीक कराडवर केवळ खंडणीचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. त्यामुळे वाल्मीक कराडला पाठीशी घालण्यात आल्याचे आरोप होत होते. त्यामुळे सरकारची प्रतीमा डागाळली. विशेष म्हणजे वाल्मीक कराडवर मकोका लागला पाहिजे अशी मागणी विरोधकांसह भाजपचे आमदार सुरेश धस यांनी देखील केली होती. त्यामुळे भाजपला घरचा अहेर मिळाला. वाल्मीक कराडला आज केज न्यायालयात सादर करण्यात आल. त्यावेळी तपास यंत्रणांना तपासासंदर्भात प्रश्न विचारण्यात आले आणि तपास कुठपर्यंत आला त्याची माहिती समोर ठेवण्यास सांगितली. त्यावेळी वाल्मीक कराडवर मकोका लावण्याचे तपास यंत्रणांनी सांगितले. अखेर वाल्मीक कराडवर मकोका लावण्यात आला.



## परळीतील पूर्ण बाजारपेठ बंद, कराड समर्थकांची रस्त्यावर गर्दी

संतोष देशमुख हत्या प्रकरणाशी संबंधित खंडणी प्रकरणात अटक असलेला आरोपी याच्यावर मकाको लावला असून त्याला 14 दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावली आहे. ही माहिती समजताच वाल्मीक कराड समर्थकांनी परळी शहर बंदची हाक दिली आहे. कराड समर्थकांनी रस्त्यावर उतरुन दुकाने बंद करण्याचे आवाहन केले. त्यानंतर व्यापाऱ्यांनी आपली दुकाने बंद केली. अत्यावश्यक सेवा वगळता परळीतील संपूर्ण बाजारपेठ बंद झाली असून रस्त्यावर शुकशुकाट पाहायला मिळत आहे.

## सहकार्य करणाऱ्या लोकांचाही शोध घेणे गरजेचे...

संतोष देशमुख हत्या प्रकरणांमध्ये आतापर्यंत जे आरोपी उघड झाले आहेत त्यापैकी कृष्णा आंधळे यांना अद्यापही अटक करण्यात आलेली नाही. त्यांना तात्काळ अटक करण गरजेचे आहे. याशिवाय या प्रकरणांमध्ये या आरोपींना मदत करणारे अनेक लोक असू शकतात त्यांचाही शोध घेणे आवश्यक आहे. वाल्मिक कराड फरार असताना त्यांना कोणी कोणी मदत केली याचाही शोध घेणे गरजेचे आहे. आणि या प्रकरणातील सर्व सहकार्यांना जेलबंद केल तर या प्रकरणाचा तपास करन पोलीस प्रशासनाला सोपं जाईल असेही सांगण्यात येत आहे.

## कराडवर मकोका लावून तपास योग्य दिशेला : अंजली दमानिया



वाल्मिक कराडला घेऊन जाऊन त्यांच्यावर मकोका लावून मकोका कोर्टापुढे सादर करण्यात येत आहे. ते ऐकून थोडं बरं वाटलं. आता गाडी कुठेतरी रुळावर येईल. आणि जी तपासाची दिशा आहे ती आता कुठे योग्य दिशेला जाईल, असे सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया म्हणाल्या.

## कायद्याच्या कचाट्यात जे कोणी सापडतील त्यांना सोडले जाणार नाही: आमदार धस



एसआयटीने जे काही काम केले आहे, जी काही या तपासात प्रगती होत आहे त्यात कोर्टाची ऑर्डर असते. त्यात याने मागणी केली, त्याने मागणी केली याचा विषयच नाही. राज्य सरकारने आता जी एसआयटी नेमली आहे त्यांनी त्यांचे काम दाखवले आहे. आता कायद्याच्या कचाट्यात जे काही सापडतील त्यांना सोडले जाणार नाही, असे आमदार सुरेश धस म्हणाले आहेत.



## कराडच्या आईना भोवळ आंदोलनस्थळ आली

आपला मुलगा निर्दोष आहे, जातीय राजकारणामुळे त्याला खोट्या गुन्ह्यात गोवण्यात आले असल्याचा आरोप करत पारूबाई कराड या परळी पोलीस ठाण्यासमोर आंदोलनात सहभागी झाल्या. वाल्मीकला सोडल्याशिवाय मी येथून हलणार नाही, अशी भूमिका त्यांनी घेतली. आंदोलन सुरू असतानाच त्यांना भोवळ आली. परंतु त्यांनी आंदोलनस्थळ सोडण्यास नकार दिला. आंदोलनाच्या ठिकाणीच डॉक्टरांनी त्यांची तपासणी केली. 'मकोका' लागल्याचे कळताच पारूबाईंचा धीर सुटला. दिवसभर पाण्याचा थेंबही न घेतल्याने त्यांना अस्वस्थ वाटू लागले. परंतु मागणी मान्य होईपर्यंत त्यांनी काहीही घेण्यास नकार दिला.



## तपास योग्य दिशेने,असा विश्वास आम्हाला पोलिसांनी दिला : धनंजय देशमुख

खंडणीच्या गुन्ह्यात वाल्डीम कराडचा ताबा हा आधी सीआयडीकडे होता. मात्र आता वाल्मीक कराडवर मकोका लावण्यात आला आहे. आता एसआयटीकडे वाल्मीक कराडचा ताबा असणार आहे. एसआयटी



आज वाल्मीक कराडला जिल्हा सत्र न्यायालयात हजर करणार आहे. या पार्श्वभूमीवर सरंपंच संतोष देशमख यांचे बंधू धनंजय म्हणाले की एसआयटीची प्रमुख तेलीसाहेब यांना आम्ही भेटलो. तपासासंदर्भात आम्ही बोललो. तपास योग्य चालू आहे. तपास असाच योग्य दिशेने चालू राहील, असे तेलीसाहेबांनी सांगितले. अजूनह सगळा तपासून होणं बाकी आहे. फरार आरोपीलाही लवकरच अटक होईल, असं पोलिसांनी सांगितलं होतं. सीआयडी आणि पोलीस यंत्रणेचं काम सुरू आहे. पहिल्या दिवसापासून ते आतापर्यंत आमची एक मागणी कायम आहे. संतोष देशमुख यांच्या हत्येमागे जे सगळे असतील ज्यांनी हे कट कारस्थान केलं. संघटीत गुन्हेगारीला बळ दिला त्यांना फाशीची शिक्षा झाली पाहिजे. तपास योग्य दिशेने होत आहे, असा विश्वास आम्हाला पोलिसांनी दिल्याचे धनंजय देशमुख म्हणाले.

## वाल्मीक कराडला हत्या प्रकरणात किती दिवसांची कोठडी आज होणार स्पष्ट

न्यायालयीन कोठडी मिळाल्यानंतर वाल्मीक कराडला बीडमध्ये नेण्यात आलं. मात्र त्याच्यावर मकोका गुन्हा दाखल झाल्यानंतर एसआयटीने प्रोडक्शन वॉरंट दाखवून त्याचा ताबा घेतला. संतोष देशमुख हत्या प्रकरणात वाल्मीक कराडचा सहभाग असल्याचा पुरावा असल्याचा दावा एसआयटीने केल्याची माहिती मिळाली आहे. या आधी खंडणीच्या गुन्ह्यातही एसआयटीकडेच त्याचा ताबा होता. वाल्मिक कराडला न्यायालयीन कोठडी मिळाल्यानंतर त्याला पहिल्यांदा तुरुंगात नेलं गेलं. त्यानंतर एसआयटीकडून त्याला हत्येच्या प्रकरणात ताब्यात घेण्यात आलं. या प्रकरणी त्याची परवानगी एसआयटीने मिळाली आहे. या प्रकरणी एसआयटीकडून कराडला आज बुधवार रोजी कोर्टात हजर करण्यात येणार आहे. वाल्मीक कराडला हत्या प्रकरणात किती दिवसांची कोठडी मिळते, ते आज स्पष्ट होणार आहे.

## ही अतिशय भयंकर टोळी : जरांगे पाटील

वाल्मीक कराडला 'मकोका' लावल्याबद्दल मनोज जरांगे पाटील यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे जाहीर कौतुक केले. मुख्यमंत्र्यांनी कुणालाही सोडणार नाही, असे म्हटले होते. ही अतिशय भयंकर टोळी आहे. एकाने खंडणी मागायची, बाकीच्यांना खून करायला पाठवायचे, काही जणांना गाडीत टाकायला पाठवायचे. ही सगळी लाभार्थी टोळी असल्याचेही जरांगे म्हणाले. खंडणीखोरांना जातीय तेढ निर्माण करायची आहे, असा आरोपही त्यांनी केला.



## जमावबंदीचे उल्लंघन करणाऱ्यांवर कठोर कारवाई होणार : पोलीस अधीक्षक



केज तालुक्यातील मस्साजोग येथील घटनेवरुन दाखल गुन्ह्याचा तपास सुरु असतांना मंगळवारी परळी-बीड रोडवर पांगरी कॅम्प, वाण नदीच्या पुलावर, टोकवाडी तसेच कन्हेरवाडी येथील पुलावर वाल्मिक कराडच्या समर्थनार्थ अज्ञात इसमांनी टायर जाळून रहदारीस अडथळा निर्माण केल्या प्रकरणी गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. परळी शहरातील रिलायन्स पेट्रोल पंपासमोर परळी ते संगम जाणाऱ्या रोडवर कराडच्या समर्थनार्थ टायर जाळण्यात आले. या प्रकरणातही गुन्हे नोंद करण्यात आले असून सदर गुन्ह्यातील आरोपीविरुद्ध कठोर कार्यवाही केली जाणार असल्याचे पोलीस अधीक्षकांनी सांगीतले.

जाहीरात व बातम्यांसाठी संपर्क
+91 97635 21855

सा. बीड नादर
नि:पक्षपाती लेखणीचा कणखर बाणा
संपादक : ज्ञानेश्वर लंगे मो. 9763521855
बुधवार, दि. 15 ते 21 जानेवारी 2025



# रुई पिंपळा येथे गहिनीनाथ यात्रेनिमित्त रंगल्या भव्य दिव्य जंगी कुस्तीच्या दंगली

**वडवणी (प्रतिनिधी) :**

वडवणी तालुक्यातील रुई पिंपळा येथे दरवर्षी प्रमाणे यावर्षी तिन दिवसीय गहिनीनाथ यात्राचे सुरेख नियोजन करण्यात आले होते. यावेळी भव्य कुस्त्यांचे आयोजन करण्यात आले होते. ही प्रथा गेल्या अनेक वर्षापासून रुई पिंपळा येथे प्रथा जपली जात आहे. याहीवर्षी देखील मोठ्या उत्साहात महाराष्ट्र केसरी पैलवान सय्यद चाऊस यांच्या उपस्थितीत कुस्त्यांच्या दंगली पार पडल्या आहेत. या विशेष कुस्ती सामने कार्यक्रमासाठी माजी आमदार श्री. केशवदादा आंधळे साहेब, महाराष्ट्र केसरी पै.श्री. शिवाजीराव केकान, बीड जिल्हा कुस्तीगीर व मल्ल संघाचे उपाध्यक्ष श्री. शिवशंकर अण्णा कराड, तसेच जेष्ठ उस्ताद श्री. बाळूभाऊ आवारे साहेब, माजी सरपंच श्री. शंकरराव आंधळे, माजी क्रीडा शिक्षक श्री. मधुकर धस सर, प्रशासकीय अधिकारी श्री. शैलेश आंधळे, जेष्ठ मुकादम श्री. कांताबापू आंधळे, जेष्ठ वकील adv. श्री. आबासाहेब आंधळे, जेष्ठ वकील श्री. adv प्रभाकर आंधळे, पै. महादेव मुजमुले, ई प्रमुख उपस्तिथी होते.

याबाबत अधिक माहिती अशी की, रुई पिंपळा येथे तिन दिवसीय गहिनीनाथ यात्राचे उत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये पहिल्या दिवशी संदल कार्यक्रम पार पडला तर दुसऱ्या दिवशी गहिनीनाथाच्या दर्शनासाठी हजारो भाविक भक्तांची गर्दी केली होती. या यात्रा उत्सवात विविध खेळण्याच्या दुकाना व आकाश पाळणे विविध प्रकारचे मोठमोठ्या दुकाणा आसतात रात्री कला मंडळ असे विविध सामाजिक सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. तसेच तिसऱ्या दिवशी भव्य कुस्त्यांचे आयोजन महाराष्ट्र केसरी पैलवान सय्यद चाऊस यांच्या उपस्थितीत केले होते. लहान मुलांपासून ते मोठ्या व्यक्तींच्या कुस्त्या पार पडल्या. यावर्षी मराठवाड्यातून आलेल्या नामांकित कुस्तीगिरांमुळे कुस्तीशौकिनांच्या डोळ्यांचे पारणे फेडणारी कुस्त्या ठरल्या.





यामध्ये मुलींच्या कुस्तीने उपस्थित त्यांचे मन वेधले होते. कुस्तीची सुरुवात 10 रु पासून ते 17 हजार रुपये पर्यंत बक्षीस देण्यात आले आहे. आनंदाच्या वातावरणात कुस्त्या पार पडल्या आहेत. यामध्ये मराठवाड्यातील पैलवान मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. शेवटी नामांकित कुस्तीपटू यांच्या आकर्षक कुस्त्या घेण्यात आल्या आणि शेवटी विजयी ठरलेल्या कुस्तीपटूला मान्यवरांच्या हस्ते नगदी 17 हजार रुपये देण्यात आले आहे. यावेळी रुई पिंपळा सह पंचक्रोशीतील कुस्तीशौकिनांनी कुस्त्याचा आनंद घेतला आहे. गहिनीनाथ यात्रेचे चोख व सुरेख नियोजन रुईचे युवा सरपंच मयुरशेट आंधळे व रुई ग्रामस्थ आणि गहिनीनाथ यात्रा उत्सव समितीने माजी आमदार केशवराव आंधळे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती दिनकरराव आंधळे, शंकरराव आंधळे, माजी सरपंच संजयभाऊ आंधळे, यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आले होते.

शेवटी परिसरातील नावजलेले कुस्ती वस्ताद यांना समितीच्या वतीने मानधन देऊन सत्कार करुन गौरव करण्यात आला आहे. या कुस्ती सामने कार्यक्रमासाठी विशेष करून गावातील तरुण मंडळी व यात्रा उत्सव समितीने खुप परिश्रम घेतले. याबद्दल सगळयात शेवटी सरपंच श्री. मयूरशेट आंधळे यांनी पोलिस प्रशासन कर्मचारी, यात्रा समितीचे पदाधिकारी, विश्वस्त,व सर्व टीम चा सत्कार करुन आभार मानले. व पुढील वर्षीचा कार्यक्रम याही पेक्षा मोठा करु असे आश्वासन दिले.

- महाराष्ट्र केसरी पै.सय्यद चाऊस विशेष यांची उपस्थिती
- जुने महाराष्ट्र केसरी श्री. पै. शिवाजीराव केकान यांची पण प्रमुख उपस्तिथी
- सावित्रीच्या लेकीच्या कुस्तीने उपस्थितांचे मन वेधले
- तिन दिवसीय यात्रेला हजारो भाविक भक्तांची उपस्थिती
- युवा सरपंच मयुरशेट आंधळे यांनी केले चोख नियोजन
- मराठवाड्यातील जवळपास ७०० ते ८०० पैलवानांनी घेतला सहभाग

# माजलगावातील सीसीआय केंद्रांवरील कापूस खरेदी पुढील आदेशापर्यंत बंद राहणार !

## सभापती जयदत्त नरवडे यांची माहिती

**माजलगाव प्रतिनीधी**



माजलगाव येथील बाजार समिती अंतर्गत असलेल्या शासकीय कापूस खरेदी केंद्रावर कापसाची मोठ्या प्रमाणात आवक झाल्याने तसेच ढगाळ वातावरणामुळे सीसीआयचे पुढील आदेश येईपर्यंत कापूस खरेदी बंद राहणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी कापूस विक्रीस आणू नये असे आवाहन सभापती जयदत्त नरवडे यांनी केले आहे.

येथील बाजार समिती अंतर्गत माजलगाव येथील सीसीआयच्या खरेदी केंद्र असलेल्या जिनींगवर सध्या मोठ्या प्रमाणावर कापूस खरेदी सुरु होती, ती आता पुढील आदेशापर्यंत बंद राहील. मनकॉट जिनिंग, पूर्वा जिनिंग, कुणाल जिनिंग, कॉटसिट जिनिंग, एच.जे. कॉटन, महाराष्ट्र जिनिंग पात्रुड याठिकाणी शासकीय कापूस खरेदी केंद्रावर सीसीआयकडून कापसाची मोठ्या प्रमाणात खरेदी करण्यात

आलेली आहे. त्यामुळे जिनिंगमध्ये कापूस ठेवण्यास जागा उपलब्ध नाही व वातावरणात झालेल्या बदलामुळे पावसाची शक्यता आहे. शेतकरी बांधवांचे नुकसान होऊ नये यासाठी १२ जानेवारीपासून ते सीसीआयचे पुढील आदेश येईपर्यंत शासकीय कापूस खरेदी बंद राहील याची शेतकरी बांधवांनी नोंद घ्यावी.

पुढील आदेश येईपर्यंत शासकीय खरेदी केंद्रावर शेतकरी बांधवांनी कापूस विक्रीस आणू नये, असे आवाहन बाजार समितीचे सभापती जयदत्त नरवडे, उपसभापती श्रीहरी मोरे, सचिव हरिभाऊ सवणे यांनी कापूस उत्पादक शेतकऱ्यांना केले आहे.

# शैक्षणिक साहित्यामुळे कृतीयुक्त शिक्षणास परिपूर्णता मिळते : केंद्रप्रमुख सुनिल मुंडे

**वडवणी :** शिक्षकांनी आपल्या शाळेमध्ये विद्यार्थ्यांना अध्यापन करतांना शैक्षणिक साहित्यांचा त्यात समावेश करावा. कृतीयुक्त अध्यापनाचा मुख्य गाभा असलेले शैक्षणिक साहित्य म्हणजे विद्यार्थ्यांच्या बौध्दिक क्षमतेला विकसित करण्यासाठी छान असे एक प्रकारचे शस्त्र असून याच शैक्षणिक साहित्यातून कृतीयुक्त शिक्षण दिल्यास त्यातून विद्यार्थ्यांना नवनिर्मितीची प्रेरणा मिळते तसेच त्यांची चिकीत्सक बुध्दिमत्ताही वाढीस लागते. तर शिक्षकांनाही दर्जेदार अध्यापनाची अनुभूती मिळते असे मनोगत चिंचवण केंद्राचे कर्तव्यदक्ष केंद्रप्रमुख सुनिल मुंडे सर यांनी चिंचवण केंद्राच्या मासिक शिक्षण परिषदेत सोन्नाखोटा या ठिकाणी शिक्षकांना उदबोधन करतांना व्यक्त केले. वडवणी तालुक्यातील चिंचवण केंद्राची ४ थी माहे जानेवारी महिन्याची मासिक शिक्षण परिषद चिंचवण केंद्रातील वडवणी तालुक्यातील गुणवत्तेची खाण असलेल्या जिल्हा परिषद प्राथमिक शाळा सोन्नाखोटा या डोंगरदऱ्यात वसलेल्या निसर्गरम्य ठिकाणी दि.११ जानेवारी २०२५ शनिवार रोजी मोठ्या उत्साहात संपन्न झाली.

# पिंपळारुई येथे कुस्त्याची दंगल संपन्न

## जिल्हाभरातील पैलवाणाची उपस्थिती

**वडवणी प्रतिनीधी :**

दरवर्षीप्रमाणे याही वर्षी पिंपळारुई येथे गैबीसाहेब पीर देवस्थान जत्रा महोत्सव ८ जानेवारी पासून संदल मिरवणूक करून सुरू झाला होता तर ९ तारखेला कंदोऱ्या व ताजी जत्रा भरली होती. १० जानेवारी शुक्रवार रोजी कुस्त्याचे आयोजन करण्यात आले होते. एक रुपयापासून ते पाच हजार एक रुपयापर्यंत कुस्त्या लावण्यात आल्या. यामध्ये वडवणी तालुक्यातील व बीड जिल्ह्यातील गावागावातून पेहलवान आले होते.

बाळू आवारे पाटोदा, जालिंदर मुंडे आबा कोल्हापूर, मनोहर कसबे बाहेगव्हाण जिवाची वाडी, होळ, चिखलबीड , चिंचवडगाव, बाहेगव्हाण, खडकी, दहीफळ, परळी या गावातील पेहलवानांनी उपस्थिती लावली होती. जिवाची वाडी येथील बाळासाहेब चौरे व पाटोदा येथील अभिषेक निराळे या दोघांच्या कुस्ती वर गावातील प्रेक्षकांनी अकरा हजार रुपये लावले होते ही कुस्ती अतिशय देखणी व डोळ्याचे पारणे फेडणारी ठरली. तसेच संभाजीनगर येथील महिला पट्टू



रेवती व राजस्थान येथील महिला पट्टू किरण या महिलेच्या कुस्तीने सर्वांचे लक्ष वेधले होते.

शेवटी नेकनुरचा आतिफ शेख पेहलवान व पिंपळा येथील पांडू पैलवान या दोघांची तर जालिंदर मुंडे यांचा पठ्ठ्या सुरज मुंडे व आष्टीचा मनोज पवार पैलवान अशा शेवटच्या दोन कुस्त्या प्रत्येकी पाच हजार रुपये इनाम देऊन लावल्या गेल्या या सर्व कुस्त्यांची नियोजन करण्यासाठी गावातील पंच कमिटी दिवसभर मेहनत घेत होती तसेच गावातील सर्व लहानथोर मंडळी व परिसरातील मंडळी उपस्थित होते. यावेळी रामधन आंधळे, महादेव आंधळे, धनंजय आंधळे सर, विष्णुपंत आंधळे, विनायक आंधळे, लक्ष्मण आंधळे, विलासराव आंधळे, दिनकर भाऊ आंधळे, डॉ. मारोतराव आंधळे, भाऊसाहेब आंधळे, श्रीमंत पाटील, गोविंदराव आंधळे, अभिजित आंधळे, पप्पू आंधळे शिवाजीराव आंधळे माणिकराव खाडे, बालासाहेब आंधळे, मुबारक शेख, शौकत शेख, ईनुस शेख, आलुभाई शेख, बंडू भांगे, बबनराव भांगे, विलास शिंदे सर, गोकुळनाना पडघण , रावसाहेब आंधळे उपसरपंच, सुमंत आंधळे, बालु आंधळे, रामेश्वर आंधळे, अमोल आंधळे, तर तुळशीदास आंधळे, सज्जन आंधळे व सरपंच केशवराव आंधळे यांनी आर्थिक नियोजन केले. या कुस्त्यांची दंगल पाहण्यासाठी हजारो च्या संख्येने लोक उपस्थित होते.

# आज रब्बी ई-पीक पाहणीची शेवटची तारीख शेतकऱ्यांनो नोंदणी करूनच घ्या : गुंदेकर

**बीड प्रतिनीधी**



रब्बी हंगाम २०२४ ई पीक पाहणी शेवटची तारीख आज आहे. सर्व शेतकऱ्यांना विनंती आहे की शेतकरी स्तरावरील ई पीक पाहणीची शेवटची तारीख आज १५ जानेवारी २०२५ करण्यात आली आहे तरी ज्या शेतकऱ्यांनी अदयाप ई पीक पाहणी केली नाही त्यांनी लवकर आपल्या पिकांची नोंद ई पीक पाहणी ॲप्लिकेशन मध्ये करून घ्यावी. असे आवाहन संचालक धनंजय गुंदेकर यांनी केले आहे. ई पीक पाहणीच्या माध्यमातून शेतकऱ्यांना खालील फायदे होतात. ई पीक पाहणी मुळे शेतकरी आपल्या पिकांची नोंद सातबारा ७/१२ यावर करु शकणार आहे. आपल्या शेतातील बांधावरील झाडाची नोंद करता येणार आहे. नुकसान झाल्यास शेती पिका संबधीत अनुदान मिळण्यास या नोंदणीची मदत होते. पिक नुकसान झाल्यास मिळणारा विमा साठी अर्ज करताना नोंदवलेलं पीक आणि ई-पीक पाहणीत नोंदवलेलं पीकच ग्रहीत धरण्यात येईल. ई-पीक पाहणी' मुळे शेतकऱ्यांच्या पिकाची व पेरणीची योग्य तीच नोंद होणार आहे. हमीभावने ज्वारी, हरभरा व इतर पिके विकायची असतील तर ई पीक पाहणी वर नोंद लागते. कूपनलिका, विहीर नोंद ई पीक पाहणी द्वारे होते म्हणून ई पीक पाहणी रब्बी करून घ्यावी असे आवाहन संचालक धनंजय गुंदेकर यांनी केले आहे.

### नगर पंचायत, वडवणी जि.बीड
### जाहिरनामा

दि. १४/०१/२०२५ फा. क्र. ११२/२०२५

**अर्जदाराचे नाव १) श्री. अमोल शाम वाघमारे २) श्री. आकाश शाम वाघमारे विक्री किंवा नावे करुन देणा-याचे नाव १) श्री. शाम रामभाऊ वाघमारे**

प्रकरणः नावनोंदणी बाबत घर क्र. सर्वे नं./गट क्र. लॉट नं. मिळकत क्र.२२४५/५ वडवणी येथील आहे. सर्व जनतेस जाहीर करण्यात येते की, वरील अर्जदाराने या कार्यालयात वरील घर नंबरवर खरेदीखत / वारसा /वाटणीपत्र या कार्यालयातील मालमत्ता कर रजिस्टर ला घेणेबाबत अर्ज दिला आहे. ज्याची साईज व चतु:सिमा खालील प्रमाणे आहे.

आकार :१) एकुण क्षेत्रापैकी अमोल पुर्व-पश्चिम १५.०० फु. व दक्षिणोत्तर ५०.०० फु. एकुण क्षे.७५०.०० चौ.फु. २.एकुण क्षेत्रापैकी आकाश पुर्व-पश्चिम १५.०० फु. व दक्षिणोत्तर ५०.०० फु.एकुण क्षे.७५०.०० चौ. फु
पुर्वः- विक्रेता पुर्वः-अमोल वाघमारे
पश्चिमः- आकाश वाघमारे पश्चिम :- विक्रेता
दक्षिणः- २५ फुट रस्ता
उत्तरः- विक्रेता उत्तरः- विक्रेता

याबाबत कोणास आक्षेप असेल तर त्यांनी हा जाहिरनामा प्रसिध्द केल्यापासून मालकी हक्काच्या लेखी पुराव्या सह पंधरा दिवसाच्या आत आक्षेप अर्ज सादर करावा. मुदतीनंतर आलेल्या आक्षेप अर्जावर विचार केला जाणार नाही.

**मुख्याधिकारी नगर पंचायत,वडवणी**

### नगर पंचायत, वडवणी जि.बीड
### जाहिरनामा

दि. १४/०९/२०२५फा. क्र. १९१/२०२५

अर्जदाराचे नाव **१) श्री. लिंबराज आश्रुबा उजगरे विक्री किंवा नावे करुन देणा-याचे नाव १) श्रीमती. यशोदाबाई आश्रुबा उजगरे**

प्रकरणः नावनोंदणी बाबत घर क्र. सर्वे नं./गट क्र. लॉट नं. मिळकत क्र.२४३ वडवणी येथील आहे.

सर्व जनतेस जाहिर करण्यात येते की, वरील अर्जदाराने या कार्यालयात वरील घर नंबरवर खरेदीखत / वारसा /वाटणीपत्र या कार्यालयातील मालमत्ता कर रजिस्टर ला घेणेबाबत अर्ज दिला आहे. ज्याची साईज व चतु:सिमा खालील प्रमाणे आहे.

आकार:१) पुर्व-पश्चिम ०.०० मी. व दक्षिणोत्तर ०.०० मी. एकुण क्षे.८६०.०० चौ.फु.

**पुर्वः पी.टी.आर प्रमाणे**
**पश्चिम : पी.टी. आर प्रमाणे**
**दक्षिणः पी.टी. आर प्रमाणे**
**उत्तरः पी.टी.आर प्रमाणे**

याबाबत कोणास आक्षेप असेल तर त्यांनी हा जाहिरनामा प्रसिध्द केल्यापासून मालकी हक्काच्या लेखी पुराव्या सह पंधरा दिवसाच्या आत आक्षेप अर्ज सादर करावा. मुदतीनंतर आलेल्या आक्षेप अर्जावर विचार केला जाणार नाही.

**मुख्याधिकारी नगर पंचायत, वडवणी**

### नगर पंचायत, वडवणी जि.बीड
### जाहिरनामा

दि. ०७/०१/२०२५
**फा. क्र. ९६/२०२५**

अर्जदाराचे नाव **१) श्री. संजय श्रीकृष्ण धपाटे**

विक्री किंवा नावे करुन देणा-याचे नाव १) श्रीमती. आयोध्या हरिचंद्र कुरे

प्रकरणः नावनोंदणी बाबत घर क्र. सर्वे नं./गट क्र.६५५ प्लॉट नं. २४ मिळकत क्र. ५०७६ वडवणी येथील आहे. सर्व जनतेस जाहीर करण्यात येते की, वरील अर्जदाराने या कार्यालयात वरील घर नंबरवर खरेदीखत / वारसा /वाटणीपत्र या कार्यालयातील मालमत्ता कर रजिस्टर ला घेणेबाबत अर्ज दिला आहे. ज्याची साईज व चतु:सिमा खालील प्रमाणे आहे.

आकारः १) पूर्व-पश्चिम ०९.२०मी. व दक्षिणोत्तर १२.२० मी. एकुण क्षे. ११२.२४ चौ.मी.

**पुर्व : लॉट नं. २३** **पश्चिम : लॉट नं. २३५**
**दक्षिणः लॉट नं. २९** **उत्तरः रस्ता**

याबाबत कोणास आक्षेप असेल तर त्यांनी हा जाहीरनामा प्रसिध्द केल्यापासून मालकी हक्काच्या लेखी पुराव्या सह पंधरा दिवसाच्या आत आक्षेप अर्ज सादर करावा. मुदतीनंतर आलेल्या आक्षेप अर्जावर विचार केला जाणार नाही.

**मुख्याधिकारी नगर पंचायत, वडवणी**

### नगर पंचायत, वडवणी जि.बीड
### जाहिरनामा

दि. ०७/०१/२०२५ **फा. क्र. ९७/२०२५**

अर्जदाराचे नाव **१) श्रीमती, रंजना बाबासाहेब आवचर**

विक्री किंवा नावे करुन देणा-याचे नाव **१) श्री. महेश बाबासाहेब आवचर**

प्रकरणः नावनोंदणी बाबत घर क्र. सर्वे नं./गट क्र. प्लॉट नं. मिळकत क्र.१४५८/२८ वडवणी येथील आहे. सर्व जनतेस जाहीर करण्यात येते की, वरील अर्जदाराने या कार्यालयात वरील घर नंबरवर खरेदीखत / वारसा वाटणीपत्र या कार्यालयातील मालमत्ता कर रजिस्टर ला घेणेबाबत अर्ज दिला आहे. ज्याची साईज व चतु:सिमा खालील प्रमाणे आहे...

आकार : १) पुर्व-पश्चिम २५ फुट. व दक्षिणोत्तर २० फुट. एकुण क्षे.५००.०० चौ.फुट. (पैकी)

**पुर्व : शेख चाँद उमर शेख**
**पश्चिम : आसेफाबी मुस्ताफा पठाण**
**दक्षिण : लिहुण देणार यांची जाग**
**उत्तर : रस्ता**

याबाबत कोणास आक्षेप असेल तर त्यांनी हा जाहीरनामा प्रसिध्द केल्यापासून मालकी हक्काच्या लेखी पुराव्या सह पंधन दिवसाच्या आत आक्षेप अर्ज सादर करावा. मुदतीनंतर आलेल्या आक्षेप अर्जावर विचार केला जाणार नाही.

**मुख्याधिकारी नगर पंचायत, वडवणी**

### नगर पंचायत, वडवणी जि.बीड
### जाहिरनामा

**दि.०७/०१/२०२५ फा. क्र. ९८/२०२५**

**अर्जदाराचे नाव १) श्री. राहुल हनुमान गावडे**

विक्री किंवा नावे करुन देणाऱ्यांचे नाव १)श्री.महादेव मुगाजी गमबडे सातपुते

प्रकरण : नावनोंदणी बाबत घर क्र. सर्वे नं./गट क्र.४२५ प्लॉट नं.३३ मिळकत क्र. वडवणी येथील आहे. सर्व जनतेस जाहीर करण्यात येते की, वरील अर्जदाराने या कार्यालयात वरील घर नंबरवर खरेदीखत /वारसा / वाटणीपत्र या कार्यालयातील मालमत्ता कर रजिस्टर ला घेणेबाबत अर्ज दिला आहे.ज्याची साईज व चतु:सिमा खालील प्रमाणे आहे.

**आकार:१) पुर्व-पश्चिम १२.१९ मी. व दक्षिणोत्तर ०६.०९ मी.एकुण क्षे.७४.२३ चौ.मी.**

**पुर्वः** राधेशाम बाबुलाल सोमाने यांचा लॉट
**पश्चिम** : ०६ मीटरचा रस्ता
**दक्षिणः** प्लॉट नं.३४ व उमेश कारभारी बाबर यांचा प्लॉट
**उत्तर** : प्लॉट नं.३२ व आन्नासाहेब रामभाऊ चव्हाण यांचा प्लॉट याबाबत कोणास आक्षेप असेल तर त्यांनी हा जाहिरनामा प्रसिध्द केल्यापासून मालकी हक्काच्या लेखी पुराव्या सह पंधरा दिवसाच्या आत आक्षेप अर्ज सादर करावा. मुदतीनंतर आलेल्या आक्षेप अर्जावर विचार केला जाणार नाही. **मुख्याधिकारी नगर पंचायत, वडवणी**

### नगर पंचायत, वडवणी जि.बीड
### जाहिरनामा

फा. क्र. ९९/२०२५ दि. ०७/०१/२०२५

अर्जदाराचे नाव १)श्री.गणेश मुंजा चौरे सातपुते
विक्री किंवा नावे करुन देणा-याचे नाव १)श्री.महादेव मुगाजी गावडे.

**प्रकरणः** नावनोंदणी बाबत घर क्र. सर्वे नं./गट क्र.४२५ प्लॉट नं.३१ व ३२ मिळकत क्र. वडवणी येथील आहे.

सर्व जनतेस जाहीर करण्यात येते की, वरील अर्जदाराने या कार्यालयात वरील घर नंबरवर खरेदीखत / वारसा /वाटणीपत्र या कार्यालयातील मालमत्ता कर रजिस्टर ला घेणेबाबत अर्ज दिला आहे. ज्याची साईज व चतु:सिमा खालील प्रमाणे आहे.

आकार:१) पुर्व-पश्चिम १२.१९ मी. व दक्षिणोत्तर ०६.०९ मी. एकुण क्षे. ७४.२३ चौ.मी. २) पुर्व-पश्चिम १२.१९ मी. व दक्षिणोत्तर ०६.०९ मी. एकुण क्षे. ७४.२३ चौ.मी.

**पुर्वः** राधेशाम बाबुलाल सोमाने यांचा लॉट पु. राधेशाम बाबुलाल सोमाने यांचा लॉट
**पश्चिम :**- ०६ मीटरचा रस्ता
**दक्षिणः** प्लॉट नं. ३२
**उत्तरः** प्लॉट नं. ३० यांचा
**पश्चिम :** ०६ मीटरचा रस्ता दक्षिणः- प्लॉट नं. ३३ व राहुल गावडे यांचा प्लॉट
**उत्तरः** प्लॉट नं. ३१ खरेदीदार यांचा

याबाबत कोणास आक्षेप असेल तर त्यांनी हा जाहीरनामा प्रसिध्द केल्यापासून मालकी हक्काच्या लेखी पुराव्या सह पंधरा दिवसाच्या आत आक्षेप अर्ज सादर करावा. मुदतीनंतर आलेल्या आक्षेप अर्जावर विचार केला जाणार नाही.

**मुख्याधिकारी नगर पंचायत, वडवणी**

### नगर पंचायत, वडवणी जि.बीड
### जाहिरनामा

फा.क्र.१०८/२०२५ दि.१४/०१/२०२५

अर्जदाराचे नाव १) **श्री. सय्यद आस्लम अफसर २) श्री.सय्यद आलिम अफसर** विक्री किंवा नावे करुन देणा-याचे नाव १) श्री. गौस सलीम कुरेशी २) श्री. साजिद अब्दुल रहीम कुरेशी प्रकरणः नावनोंदणी बाबत घर क्र. सर्वे नं./गट क्र.४२३ लॉट नं. मिळकत क्र. वडवणी येथील आहे. सर्व जनतेस जाहीर करण्यात येते की, वरील अर्जदाराने या कार्यालयात वरील घर नंबरवर खरेदीखत / वारसा /वाटणीपत्र या कार्यालयातील मालमत्ता कर रजिस्टर ला घेणेबाबत अर्ज दिला आहे. ज्याची साईज व चतु:सिमा खालील प्रमाणे आहे.

आकार : १) लांबी पुर्व-पश्चिम १४.९३ मी. व रुंदी दक्षिणोत्तर ५.४७मी. एकुण क्षे.८१.६६ चौ.मी.
पुर्वः कौसल्या दत्तात्रय सुरवसे
पश्चिम : २० फुट रस्ता
दक्षिणः राठोड यांची जागा
उत्तरः संजीवनी आसाराम चौरे

याबाबत कोणास आक्षेप असेल तर त्यांनी हा जाहीरनामा प्रसिध्द केल्यापासून मालकी हक्काच्या लेखी पुराव्या सह पंधरा दिवसाच्या आत आक्षेप अर्ज सादर करावा. मुदतीनंतर आलेल्या आक्षेप अर्जावर विचार केला जाणार नाही.

**मुख्याधिकारी नगर पंचायत, वडवणी**

### नगर पंचायत, वडवणी जि.बीड
### जाहिरनामा

**दि. १४/०१/२०२५ फा.क्र.१०९/२०२५**

अर्जदाराचे नाव १) **श्रीमती. कमल विजयकुमार अंडिल** विक्री किंवा नावे करुन देणा-याचे नाव १) श्री. ज्ञानेश्वर युवराज चव्हाण **प्रकरणः** नावनोंदणी बाबत घर क्र. सर्वे नं./गट क्र. ६४६ लॉट नं. मिळकत क्र. वडवणी येथील आहे. सर्व जनतेस जाहीर करण्यात येते की, वरील अर्जदाराने या कार्यालयात वरील घर नंबरवर खरेदीखत / वारसा /वाटणीपत्र या कार्यालयातील मालमत्ता कर रजिस्टर ला घेणेबाबत अर्ज दिला आहे. ज्याची साईज व चतु:सिमा खालील प्रमाणे आहे.

आकार:१) पुर्व-पश्चिम ३० फुट व दक्षिणोत्तर ६७. एकुण क्षे. २०१०.०० चौ.फु.
**पुर्व :** सुग्रीव रामचंद्र मस्के व विक्रेता
**पश्चिम :** महानंदा पांडुरंग अंडील खरेदीदार
**दक्षिण :** खरेदीदार
**उत्तर :** बाळासाहेब ढगे व वगैरे

याबाबत कोणास आक्षेप असेल तर त्यांनी हा जाहीरनामा प्रसिध्द केल्यापासून मालकी हक्काच्या लेखी पुराव्या सह पंधरा दिवसाच्या आत आक्षेप अर्ज सादर करावा. मुदतीनंतर आलेल्या आक्षेप अर्जावर विचार केला जाणार नाही.

**मुख्याधिकारी नगर पंचायत, वडवणी**

### नगर पंचायत, वडवणी जि.बीड
### जाहिरनामा

फा.क्र.११०/२०२५ दि. १४/०१/२०२५

अर्जदाराचे नाव **१) श्री. सुशिल बाबासाहेब मुंडे विक्री किंवा नावे करुन देणा-याचे नाव १) श्रीमती. नीता शिवाजी मोतुळे**

प्रकरणः नावनोंदणी बाबत घर क्र. सर्वे नं./गट क्र. २२० लॉट नं. मिळकत क्र.३३१३ वडवणी येथील आहे.

सर्व जनतेस जाहीर करण्यात येते की, वरील अर्जदाराने या कार्यालयात वरील घर नंबरवर खरेदीखत / वारसा /वाटणीपत्र या कार्यालयातील मालमत्ता कर रजिस्टर ला घेणेबाबत अर्ज दिला आहे. ज्याची साईज व चतु:सिमा खालील प्रमाणे आहे. आकारः १) लांबी पुर्व-पश्चिम ९.१४ मी. व रुंदी दक्षिणोत्तर १२.१९ मी . एकुण क्षे. १११.४१ चौ.मी.

पुर्वः ४.५ मी. रस्ता
पश्चिम : प्लॉट क्र. ०७ यांची सहनजागा
दक्षिणः विलास काळे यांची सहनजागा
उत्तर : ४.५ मी रस्ता

याबाबत कोणास आक्षेप असेल तर त्यांनी हा जाहीरनामा प्रसिध्द केल्यापासून मालकी हक्काच्या लेखी पुराव्या सह पंधरा दिवसाच्या आत आक्षेप अर्ज सादर करावा. मुदतीनंतर आलेल्या आक्षेप अर्जावर विचार केला जाणार नाही.

**मुख्याधिकारी नगर पंचायत, वडवणी**

जाहीरात व
बातम्यांसाठी संपर्क
+91 97635 21855

सा. बीड गादर
नि:पक्षपाती लेखणीचा कणखर बाणा
संपादक : ज्ञानेश्वर लंगे मो. 9763521855
बुधवार, दि. 15 ते 21 जानेवारी 2025




घनसावंगी जिल्हा जालना येथे येथे राजमाता जिजाऊ यांना जयतीनिमित्त अभिवादन करण्यात आले.

# आगामी निवडणुकीत कार्यकर्त्यांना गुलाल लावणार

## आमदार बबनराव लोणीकर यांचे प्रतिपादन




**परतुर प्रतिनिधी**

दिनांक 14 पासून 20 तारखेपर्यंत मतदार संघातील गावागावातील पदाधिकारी कार्यकर्त्यांनी गावात राहून संपूर्ण दिवस स्वतःला झोकून देऊन सदस्यता नोंदणी करावी असे आवाहन माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांनी केले. ते परतुर येथे महा सदस्यता नोंदणी अभियानांतर्गत आयोजित करण्यात आलेल्या कार्यकर्ता पदाधिकारी बैठकी प्रसंगी बोलत होते. पुढे बोलताना ते म्हणाले की भारतीय जनता पार्टीसह पक्षाच्या सर्व प्रकोष्ठांनी आपल्याला दिलेले उद्दिष्ट येत्या चार दिवसात पूर्ण करणे गरजेचे असून जगातील सर्वात मोठ्या पक्षाचे सदस्य नोंदवण्याची जबाबदारी ही तुमच्यावर असून देशाचे लोकप्रिय पंतप्रधान नरेंद्र जी मोदी मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या नेतृत्वात महाराष्ट्रात भारतीय जनता पार्टी हा सर्वात मोठा पक्ष असून केंद्र व राज्य सरकारने विविध योजना राबवून सर्वसामान्य जनतेला न्याय देत विविध योजना घराघरापर्यंत पोहोचवल्या त्यामध्ये प्रामुख्याने लाडकी बहीण, शेतकऱ्यांसाठीच्या वैयक्तिक लाभांच्या विविध योजना, घरकुल यासारख्या योजना साला प्रत्यक्ष सर्वसामान्यांपर्यंत पोहोचला असून या सर्वांना भारतीय जनता पार्टीशी जोडून घेण्याची जबाबदारी आपल्या सर्वांचे असल्याचे यावेळी बोलताना त्यांनी नमूद केले येणाऱ्या निवडणुका या कार्यकर्त्यांच्या असून त्यासाठी कार्यकर्त्यांनी या अभियानाच्या माध्यमातून स्वतःला सिद्ध करीत निवडणुकीत आपला दावा करावा असे आवाहन यावेळी बोलताना त्यांनी उपस्थित पदाधिकारी कार्यकर्त्यांना केले पुढे बोलताना ते म्हणाले की पक्षाचे दोन खासदार अटलजी आणि अडवाणी जी यांच्यापासून सुरू झालेला प्रवास हा जगातील सर्वात मोठा पक्ष इथपर्यंत आलेला असून, आपण सर्वांनी खंबीरपणाने पक्षाचे काम करून पक्षाला अधिक मजबूत करण्यासाठी काम करावे असेही या वेळी बोलताना सांगितले . पुढे बोलताना ते म्हणाले की, भारतीय जनता पक्षाचा कार्यकर्ता हा चिवट कार्यकर्ता असून या झुंजार कार्यकर्त्यांनी पक्षाला एवढ्या मोठ्या स्थानापर्यंत आणून पोचवले आहे त्यामुळे आपणही संपूर्णपणे आपली ताकद पणाला लावून नोंदणी करावी अशी ही यावेळी बोलताना ते म्हणाले

यावेळी तालुकाध्यक्ष शत्रुघन कणसे जिल्हा सरचिटणीस रमेश भापकर युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष संपत टकले, उपसभापती संभाजी वारे भगवानराव मोरे शहराध्यक्ष प्रवीण सातोणकर, परमेश्वर आकात, नितीन जोगदंड अंकुशराव नवल शिवाजी पाईकराव, बंडू मानवतकर छाया ताई घोरबांड, भाग्यश्री ताई ढवळे , सीमाताई सोळंके, जगदीश पडोळकर, राजेभाऊ आळने भगवान आरडे, माऊली सोळंके, मधुकर मोरे सुरेश जगताप, हनुमान चिखले विठ्ठल बिडवे नारायण बिडवे, बाबाराव थोरात, नसरुल्ला काकड, बाबा सोळंके आसिफ कच्ची , हनुमंत चिखले शंकर पाष्टे यांच्यासह असंख्य कार्यकर्त्यांची उपस्थिती होती.



### आमदार लोणीकरांच्या नेतृत्वाखाली जास्तीत जास्त भाजपाचे सदस्यत्व स्वीकारावे : शेजुळ

माजी मंत्री तथा विद्यमान आमदार माननीय बबनरावजी लोणीकर साहेब व भाजपा प्रदेश सचिव माननीय श्री राहुल भैया लोणीकर यांच्या नेतृत्वाखाली नेर _ सेवली सर्कलमधील कार्यकर्त्यांनी आणि नागरिकांनी सदस्य नोंदणी मोहिमेमध्ये सहभागी होऊन मोठ्या प्रमाणात भाजपाचे सदस्यत्व स्वीकारावे असे आवाहन भाजपा किसान मोर्चाचे जालना जिल्हा अध्यक्ष तथा जालना कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक श्री ज्ञानेश्वर माऊली शेजुळ यांनी उपस्थितांना केली आहे.

## संभाजी ब्रिगेडच्या धरणे आंदोलनाने प्रशासन टाळ्यावर

### ज्या गावात ग्रामसेवक मुख्यालयी राहत नाहीत तेथील नागरिकांनी माझ्याशी संपर्क करावा : बाळासाहेब खवने

**मंठा प्रतिनीधी**

ग्रामसेवकांना मुख्यालयी राहणे अनिवार्य आहे. त्यासंदर्भात शासनाचे परिपत्रकदेखील आहे. तरीदेखील तालुक्यातील बहुतेक ग्रामसेवक हे मुख्यालयी राहत नसल्याने संभाजी ब्रिगेडने वार सोमवार(दि. १३) पंचायत समिती कार्यालयासमोर धरणे आंदोलन सुरू केले असता प्रशासन ताळ्यावर ताळ्यावर आले. तत्काळ पंचायत समिती च्या अधिकाऱ्याने भेट देत यापुढे हाईगाई करुन मुख्यालई न थांबणाऱ्या ग्रामसेवक यांच्यावर कारवाई करू असा शब्द संभाजी ब्रिगेट तालुका प्रमूख बाळासाहेब खवने यांना दिला.

मागील एक महिन्यापासून संभाजी ब्रिगेडचे कार्यकर्त्यांनी हे तालुक्यातील प्रत्येक ग्रामपंचायत कार्यालयात पाहणी केली. यावेळी ग्रामसेवक उपस्थित आहे की नाही याचे पुरावे गोळा केले आहेत. यापूर्वी संघटनेकडून देण्यात आलेल्या निवेदनात ग्रामसेवकांना मुख्यालयी राहण्याचे आदेश देण्यात यावेत,





अशी मागणी करण्यात आली होती. परंतु, मागील निवेदनानंतरदेखील पंचायत समितीने कुठलीही कारवाई केलेली नाही. यामुळे धरणे आंदोलन तालुका प्रमूख बाळासाहेब खवने यांनी पुढाकार घेत संभाजी ब्रिगेडच्या वतीने धरणे आंदोलन केले. या धरणे आंदोलनाची पंचायत समिती अधिकाऱ्याकडून तात्काळ पावले उचलत आंदोलनाची दखल घेत त्यावर अंमलबजावणी करण्याचे आदेश समधीत ग्रामसेवकांना दीले. तरी यात यापुढे हाईगाई झाली तर भविष्यात उग्र आंदोलनं करणार असल्याचा कडक इशाराही संभाजी ब्रिगेड च्या वतीने देण्यात आला.

## विद्यार्थ्यांनी शिक्षणासोबतच चारित्र्यसंपन्न व्यक्तिमत्त्व घडवावे

### सहायक पोलिस निरीक्षक सचिन इंगेवाड यांचे प्रतिपादन

**परतूर प्रतिनीधी :**

शालेय जीवनात शिक्षणासोबतच बलोपासना करून चारित्र्यसंपन्न व्यक्तिमत्त्व घडवावे, असे प्रतिपादन आष्टी पोलिस स्टेशनचे सहायक पोलिस निरीक्षक सचिन इंगेवाड यांनी केले. श्री समर्थ माध्यमिक विद्यालयात विद्यार्थिनीची सुरक्षितता या समुपदेशन कार्यक्रमात मार्गदर्शन करताना त्यांनी विद्यार्थिनीसोबत कोणत्याही प्रकारचे गैरवर्तन चालणार नाही. अशा गैरवर्तनासाठी शिक्षा म्हणून असलेला पोक्सा कायद्याबाबत विद्यार्थ्यांना माहिती देण्यात आली. संपूर्ण महाराष्ट्रात शालेय विद्यार्थिनींची सुरक्षितता या संदर्भात शासनाने दिशा निर्देश दिले. आहेत त्याचाच एक भाग म्हणून सदरील कार्यक्रमाचे आयोजन विद्यालयात करण्यात आले होते. विद्यार्थ्यांनी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे देऊन प्रेरणा दिली. विद्यालयाचा संपूर्ण परिसर सीसीटीव्हीच्या कक्षेत असल्याने इंगेवाड यांनी समाधान व्यक्त केले. विद्यार्थिनींच्या सुरक्षितते संदर्भात विद्यालय करीत असलेल्या कार्याचे कौतुक केले. यावेळी उपाध्यक्ष तुळशीदास खवल, कोषाध्यक्ष प्रभाकर कादे, सरपंच हरिभाऊ खवल, तंटामुक्त गाव समितीचे अध्यक्ष शिवाजी कादे, ग्रा.पं. सदस्य सदुभाऊ खवल, गणेश खवल, लक्ष्मण शिंदे, भीमराव शिंदे, बालासाहेब नखाते, भाऊसाहेब कादे, पंडित मुंढे, सुरेश शिंदे, गोरख वखरे, पो.का. देवळे, पो.का. शिंदे मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.



## स्वराज्य शिक्षक संघाच्या मंठा-परतूर तालुकाध्यक्ष पदी विजयजी राठोड यांची निवड.



**मंठ प्रतिनीधी**

स्वराज्य शिक्षक संघाच्या मंठा-परतूर तालुकाध्यक्ष पदी विजयजी राठोड ( विवेकानंद प्रा. शाळा परतूर)यांची निवड करण्यात आली. विजय राठोड अनेक वर्षापासून शैक्षणिक क्षेत्रात विना तथा अशतः अनुदानितांसाठी उल्लेखनीय कार्य करित आहेत. म्हणुन त्यांच्या कार्याची दखल घेऊन स्वराज्य शिक्षक संघाच्या शिक्षक पदाधिकारी मंडळाणे त्यांची मंठा-परतूर तालुकाध्यक्ष पदावर नियुक्ती केली आहे.

या प्रसंगी स्वराज्य शिक्षक संघाचे अध्यक्ष श्री.ज्ञानेश चव्हाण, प्रदेशध्यक्ष ज्ञानेश्वर शेळके, महासचिव श्री शंकर शेरे, कार्याध्यक्ष दत्तात्रय चव्हाण, विजय सुराशे, गिरीश मखमले यांनी झूम मिटिंग वर झालेल्या ऑनलाइन बैठकीत नियुक्ती पत्र देऊन भविष्यात आपल्या हातून निरंतर शैक्षणिक तथा सामाजिक कार्य अविरत घडत राहो. पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## वाई जिल्हा परिषद शाळेत राष्ट्रमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांची जयंती साजरी

**मंठा प्रतिनीधी :**

तालुक्यातील वाई जिल्हा परिषद उच्च माध्यमिक शाळा येथे आज दिनांक 12 जानेवारी 2025 रोजी राजमाता राष्ट्रमाता जिजाऊ आऊसाहेब आणि स्वामी विवेकानंद यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. त्यानिमित्ताने सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी श्री संतोष सरकटे सर आणि प्रमुख अतिथी श्री नारायण उबाळे शाळेय समिती अध्यक्ष हे विराजमान होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन समृद्धी उबाळे या विद्यार्थिनी केले सर्वप्रथम राजमाता जिजाऊ आणि स्वामी विवेकानंदाच्या प्रतिमेचे पूजन अध्यक्ष व प्रमुख पाहुण्याच्या हस्ते करण्यात आले त्यानंतर शाळेतील विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले यामध्ये श्रेया,रिया प्रधान, सिद्धी कावळे, श्रावणी गोळे, रूपाली प्रधान ,प्रतीक्षा खंदारे ,मयुरी उबाळे, श्रुती चौंडे, दुर्गा खंदारे ,या विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट भाषणे केली आणि शेवटी जिजाऊच्या जीवनावर आधारित प्रतीक्षा खंदारे श्रावणी गोळे श्रुती चौडे आणि ज्ञानेश्वरी उबाळे यांनी सुंदर गीत सादर केले कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण म्हणजे विद्यार्थ्यांची वाचणे आणि जिजाऊ च्या वेशात चंद्रकोरीचे दर्शन सुखव्ह व आणि अभिमानास्पद होतं.



## नितीन जेथलिया यांचा शेकडो कार्यकर्त्यांसह शिवसेनेत प्रवेश

### युवा नेत्यांच्या प्रवेशाने परतूर, मंठ्यात शिवसेनेची ताकत वाढली


**परतूर/प्रतिनीधी**

परतूर- मंठा मतदारसंघाचे काँग्रेसचे युवा नेते नितीन जेथलिया यांनी शुक्रवारी (दि.९) जानेवारी रोजी मुंबई येथे उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांच्या उपस्थितीत शेकडो - कार्यकर्त्यांसह शिवसेना शिंदेगटात प्रवेश केला आहे. टेंभीनाका आनंद आश्रम ठाणे येथे झालेल्या या प्रवेश सोहळ्यास खासदार संदिपान भुमरे यांच्यासह वरिष्ठ नेत्यांची उपस्थिती होती.

या प्रवेशाबद्दल नितीन जेथलिया यांनी पत्रकारांशी बोलतांना सांगितले की, गेल्या अनेक वर्षांपासून माजी आ. सुरेशकुमार जेथलिया यांनी काँग्रेसचे इमाने इतबारे काम करत कार्यकर्त्यांची मोठी फळी निर्माण केली. काँग्रेस पक्षाला चांगले दिवस आणले. मात्र शब्द देऊन ऐनवेळेला वरिष्ठांनी आमचे नेते सुरेशकुमार जेथलिया यांना उमेदवारी दिली नाही. काँग्रेसच्याच नेत्यांनी जेथलिया यांच्यासोबत नेहमी षडयंत्र रचत प्रत्येक वेळी त्यांच्यासोबत दगा फटका केला. त्यामुळे आपण शिवसेनेत प्रवेश केला आहे. माजी आ. सुरेशकुमार जेथलिया हे देखील लवकरच निर्णय घेत परतूर मतदारसंघात मोठ्या समारंभात शिवसेना शिंदे गटात प्रवेश करणार असल्याची माहिती त्यांनी यावेळी दिली. नितीन जेथलिया यांच्या मार्गदर्शनाखाली माजी जि. प. सदस्य इंद्रजित घनवट, काँग्रेसचे उपतालुका प्रमुख मंजुळदास सोंळके, लक्ष्मण शिंदे, माजी नगराध्यक्ष अविनाश शहाणे, डिगंबर इंगळे, तारेख सिद्दीकी यांच्यासह कार्यकर्त्यांनी शिवसेनेत प्रवेश केला आहे. यावेळी त्यांचे स्वागत करण्यात आले







सौ मीराताई बोराडे यांचा नगराध्यक्ष पदाचा राजीनामा. मंठा/ प्रतिनिधी : मंठा नगरपंचायतच्या नगराध्यक्षा सौ मीराताई बालासाहेब बोराडे यांनी आपल्या पदाचा राजीनामा जिल्हाधिकारी जालना यांच्याकडे सादर केला. मागील अडीच वर्षाच्या कार्यकाळात शिवसेना जिल्हाप्रमुख ए.जे.पाटील बोराडे यांच्या नेतृत्वाखाली मंठा शहरात अनेक विकासाची कामे करण्यात आली.सर्वांना विश्वासात घेऊन त्यांनी मंठा शहरात रस्ते, पाणी, दिवाबत्ती, स्वच्छता या मूलभत प्रश्नाकडे प्राधान्याने लक्ष दिले. शासनाने नगराध्यक्ष पदाचा अडीच वर्षाचा कार्यकाळ रद्द केला होता. मात्र, तरीही त्यांनी आपल्या कौटुंबिक जबाबदाऱ्यांमुळे नगराध्यक्षपदाचे कामकाज करण्यासाठी पूर्ण वेळ देऊ शकत नाही म्हणून आपला नगराध्यक्ष पदाचा राजीनामा सोमवार ता. सहा रोजी जिल्हाधिकारी यांच्याकडे सादर केला आहे.

जाहीरात व
बातम्यांसाठी संपर्क
+91 97635 21855

सा. बीड गदर
नि:पक्षपाती लेखणीचा कणखर बाणा
संपादक : ज्ञानेश्वर लंगे मो. 9763521855
बुधवार, दि. 15 ते 21 जानेवारी 2025








# माजलगाव येथे ऊस संवाद परिषद संपन्न

## आमदार सोळंके यांच्या वाढदिवसानिमित्त वृक्ष लागवड व पुस्तकांचे वाटप लढा दुष्काळाशी फाउंडेशनचा उपक्रम

**माजलगाव प्रतिनिधी**

माजलगाव मतदार संघाचे लोकप्रिय आमदार प्रकाश दादा सोळंके यांच्या वाढदिवसानिमित्त माजलगाव येथे ऊस संवाद परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. या परिषदेसाठी माजलगाव मतदार संघातील हजारो शेतकरी ऊस उत्पादक उपस्थित होते. लोकनेते सुंदररावजी सोळंके सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष वीरेंद्र सोळंके व उपाध्यक्ष जयसिंह सोळंके यांची या कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती होती. या कार्यक्रमात अनेक मान्यवरांनी ऊस संशोधकांनी शेतकऱ्यांना मार्गदर्शन केलं. या उस परिषदेमुळे उस बागतदार शेतकऱ्याच्या आर्थिक प्रगतीत मदत होणारं आहे. या कार्यक्रमानंतर लगेच लढा दुष्काळाशी फाउंडेशनच्या वतीने परिसरात प्रकाश दादा सोळंके यांच्या 71 व्या वाढदिवसानिमित्त ७१ झाडे लावण्यात आले व 71 लोकांना मासाहेब जिजाऊंच्या चरित्राचे पुस्तक वाटप करण्यात आले. या कार्यक्रमात ग्राहक भांडार चे व्यवस्थापक भगवान शेजुळ यांच्यासह विविध कंपन्यांचे अधिकारी कर्मचारी उपस्थित होते लढा दुष्काळाशी फाउंडेशनचे अध्यक्ष ॲड.राज पाटील यांनी उपस्थित सर्वांना झाडे वाटप केले यावेळी पिंपरखेड चे सरपंच अशोक निपटे,देवगावचे माजी सरपंच ज्ञानेश्वर सुरवसे, डॉ. प्रवीण सावंत,पत्रकार हनुमंत मात्रे, पत्रकार अंकुश गवळी यांची ही उपस्थिती होती आमदार सोळंके यांना दीर्घायुष्य लाभाव आणि त्यांचे विकास प्रिय नेतृत्व असंच फुलत राहावं अशा पद्धतीच्या शुभेच्छा यावेळी ॲड.राज पाटील यांनी दिल्या.

# पौष पौर्णिमेनिमित्त सप्ताहाची सांगता

## चौडेश्वरी मातेच्या जयघोषांनी वडवणीनगरी दुमदुमली

**वडवणी,प्रतिनिधी:**

प्रतिवर्षीप्रमाणे यावर्षीही अत्यंत कष्टाळू व प्रामाणिक असलेल्या कापड तयार करणारा कोष्टी समाजाची कुलस्वामि भी माता श्री. चौंडेश्वरी मातेचा पौष पौर्णिमेनिमित्त मोठा उत्सव सबंध देशभरामध्ये मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येतो. याच अनुषंगाने वडवणी येथे सोमवारी शहरात माता चौंडेश्वरीची भव्य शोभायात्रा टाळ मृदुंगाच्या गजरात काढण्यात आली. यावेळी प्रत्येक घरासमोर सुंदर अशा रांगोळी काढून या पालखी मिरवणुकीचे स्वागत करण्यात आले. चिमुकल्या मुलीही डोक्यावर कळस घेवून यात सहभागी झाल्या होत्या. यावेळी चौंडेश्वरी मातेच्या जयघोषांनी समस्त वडवणीनगरी अक्षरशः दुमदूमून गेली होती. त्यानंतर दुपारी वडवणी व पंचक्रोशीतील हजारो भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला.



याबाबत अधिक माहिती अशी की, प्रतिवर्षीप्रमाणे यावर्षीही अत्यंत कष्टाळू व प्रामाणिक असलेल्या कापड तयार करणारा कोष्टी समाजाची कुलस्वामिनी माता श्री. चौंडेश्वरी मातेचा पौष पौर्णिमेनिमित्त मोठा उत्सव सबंध

देशभरामध्ये मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येतो. याच अनुषंगाने वडवणी येथे बहुसंख्य असलेल्या कोष्टी समाजाच्या वतीने प्रतिवर्षी विविध सांस्कृतिक, सामाजिक, धार्मिक उपक्रमांचे आयोजन करुन हा सोहळा साजरा करण्यात येतो. या सोहळ्यासाठी वडवणी तालुक्याच्या बाहेरुन देखील भाविक भक्त येत असतात. प्रतिवर्षीप्रमाणे या वर्षीही अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते. महाराष्ट्रातील ख्यातनाम कीर्तन मंडळींचे दररोज कीर्तन याठिकाणी संपन्न झाले. या उत्सवाच्या शेवटच्या दिवशी काल दि.१३ जानेवारी २०२५ सोमवार रोजी माता चौंडेश्वरीची भव्य शोभायात्रा मंदिरापासून शहरभर सकाळी टाळ मृदुंगाच्या गजरात काढण्यात आली. यावेळी प्रत्येक घरासमोर सुंदर अशा रांगोळी काढून या पालखी मिरवणूकीचे स्वागत करण्यात आले. चिमुकल्या मुलीही डोक्यावर कळस घेवून यात सहभागी झाल्या होत्या. यावेळी चौंडेश्वरी मातेच्या जयघोषांनी समस्त वडवणीनगरी अक्षरशः दुमदुमून गेली होती. या शोभा मिरवणूकीनंतर रामायणाचार्य ह.भ.प. नामदेव महाराज लबडे यांच्या काल्याच्या कीर्तनाने या अखंड हरिनाम सप्ताहाची व महोत्सवाची सांगता झाली. या काल्याच्या किर्तनाला देखील हजारो भाविकांनी उपस्थिती दर्शविली होती. यामध्ये विशेष करुन महिला भगिनींची उपस्थिती लक्षणीय होती. किर्तन झाल्यानंतर लागलीच श्री. चौंडेश्वरी मंगल कार्यालय, श्रीराम मंदिर चौक वडवणी येथे महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. वडवणीसह पंचक्रोशीतील हजारो भाविकांनी आयोजित या महाप्रसादाचा लाभ घेतला. या संपूर्ण महोत्सवाच्या यशस्वीतेसाठी उत्सव समिती व कोष्टी समाज बांधव यांनी खूप परिश्रम घेतले.

# आज देवडी येथील राणुबाई देवीची यात्रा

## भावीकांनी यात्रा महोत्सवास उपस्थीत रहावे गावकऱ्यांचे आवाहन

**वडवणी : प्रतिनीधी**

वडवणी तालुक्यातील देवडी येथे दर वर्षी प्रमाणे याही वर्षी पौष पोर्निमेला देवीचा मोठा यात्रा महोत्सव होणार आहे.या यात्रा महोत्सवात येणाऱ्या व्यापाऱ्यांची व भविशांची गैरसोय होऊ नये म्हणुन त्यांना जागा उपलब्द करुन देणे, पाणी लाईट व्यवस्था वाहान पार्किंगची व्यवस्था केली आहे.यात्रा महोत्सवात विविध सामाजीक सांस्कृतीक कार्यक्रमाचे आयोज करण्यात आले आहे.

तरी या यात्रा ऊत्सवाचा जिल्ह्यातील हाजारो भाविक भक्तांनी उपस्थीत राहाण्याचे आवाहन गावकऱ्यांनी आवाहन केले आहे. या यात्रा उत्सवामध्ये बुधवार दि १५ जानेवारी रोजी दुपारी १२ वा गाड्या ओढण्याचा कार्यक्रम होणार आहे. रात्री संपूर्ण गावामध्ये गावात संभळ वाद्य,ढोल ताशांच्या गजराती,तोफांच्या सलामीत छबिना मिरवणूक होणार आहे.गुरूवार दि १६ जानेवारी रोजी दुपारी जंगी कुस्त्यांचे सामने व रात्री मनोरंजनपर सुप्रसिद्ध लोकनाट्य तमाशा मंडळ होणार आहे. पासून उत्तरेस १५ किलोमीटर अंतरावर साडेचार हजार लोकसंख्या असलेले देवडी हे गाव माजलगाव जलशयाच्या कुशीत एक सदन गाव आहे.या ठिकाणी पूर्वीपासूनच नवसाला पावणारी



रानुबाई देवी म्हणून प्रसिद्ध आहे.या ठिकाणी मोठे देवीचे मंदिर आहे.महाराष्ट्रातील हजारो भावी भक्तांचे आराध्य दैवत म्हणुन रागूबाई देवी कडे भाविक भक्त नवस बोलतात व ही देवी भाविक भक्तांचे नवसही पूर्ण करते आणि ते देवीचे नवस फेडण्यासाठी गेली नऊ दिवस झाले अंगाला हळद लावून हे भाठिक भक्त कोणालाही स्पर्श न करता देवीच्या दरबारामध्ये नऊ दिवस पूजा आराधना करत असतात. या नऊ दिवसामध्ये संपूर्ण गावातील देवी भक्त उपवास करत असतात. या नऊ दिवसांमध्ये महाराष्ट्रातील प्रसिद्ध आराधी मंडळ, भारुड, गवळणी आधी भरगच्च कार्यक्रमांची गावकर्यांना मनोरंजन पर मेजवानीच असते. देवडी गावातील व पंचक्रोशीतील माहेर वासिनी लेकी बाळी आपल्या लाडक्या रानुबाई देवीची खना नारळाची ओटी भरण्यासाठी व आशीर्वाद घेण्यासाठी महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून पौष पोर्णिमेला हजेरी लावत असतात. नवस करणारे देवीभक्त आठ दिवस अंगाला हळद लावून पूजाआराधना करून नवव्या दिवशी म्हणजे पौष पौर्णिमेला गुलालाचर्थी व लेवड्यांची उधळण करत देवीचा गजर करत बारा गाड्या ओढत आपला नवस पूर्ण करत असतात.

# चिंचवन येथे मकरध्वज जन्मोत्सव सोहळा संपन्न

## मकरध्वजाच्या दर्शनासाठी लाखो भाविकांची मांदियाळी



**वडवणी प्रतिनिधी**

भारत देशात हनुमान पुत्र म्हणून ओळखले जाणारे मकरध्वजाचे एकमेव मंदिर बीड जिल्ह्यातील वडवणी जवळ चिंचवन येथे आहे. रामायण काळात मंकावती नगरी हीच आजचे चिंचवण आहे. याच ठिकाणी राम लक्ष्मणाला बंदिस्त करून ठेवले होते. आणि याच ठिकाणावरून मकरध्वज व हनुमंताचे युद्ध होऊन हनुमंताने त्यांची सोडवणूक केली होती. रामायण काळातील या ठिकाणीच भव्य दिव्य मकरध्वज जन्मोत्सव सोहळा साजरा झाला.

या सोहळ्याची काल्याच्या कीर्तनाने सांगता झाली. चिंचवन येथील या सोहळ्यात महाराष्ट्र राज्यातील नामवंत कीर्तनकाराची कीर्तने झाले. गावातील सर्व नागरिक मोठ्या उत्साहात या सोहळ्यामध्ये सहभागी झाले होते. पंगतीत मोठ्या प्रमाणात अन्नदान झाले. या सोहळ्यात नामवंत महाराजांची कीर्तने झाले आहेत. हा सोहळा सर्व गावकऱ्यांच्या सहकार्यामुळे यशस्वीपणे पार पडला आहे. सकाळी दिवस सूर्योदय वेळी मकरध्वज जन्मोत्सव सोहळा साजरा करण्यात आला. यावेळी फुले उधळून हरिनामाचा गजर झाला.या सोहळ्यासाठी परिसरातील हजारो भाविकांची उपस्थिती होती.

# सर्वसामान्यांच्या अडचणी सोडविण्यासाठी पत्रकारांची बलेखणी झिजते : माजी आ. केशवराव आंधळे


## दर्पण दिनाच्या निमित्ताने धस कुटूंबियांकडून पत्रकारांचा सन्मान

**वडवणी प्रतिनीधी**

वडवणी शहरातील धस कुटुंबीयांच्या साई आशिर्वाद ट्रेडर्स याठिकाणी प्रतिवर्षी प्रमाणे याहीवर्षी दि.६ जानेवारी २०२५ सोमवार रोजी दर्पण दिनानिमित्त वडवणी तालुक्यातील पत्रकार बांधवांच्या सन्मान सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी असंख्य मान्यवरांसह पत्रकार बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाला विशेष प्रमुख आणि मार्गदर्शक



म्हणुन माजी आ. केशवराव आंधळे, वडवणी न.प. उपनगरध्यक्ष बन्शी मुंडे, जेष्ठ संचालक पांडुरंग आडील, भाजपा युवा मोर्चाचे तालुकाध्यक्ष ईश्वर तांबडे, सेवानिवृत्त आदर्श शिक्षक मधुकरराव धस, शिक्षक उध्दव बडे यांच्यासह पत्रकार उपस्थिती होती. यावेळी वडवणी शहरासह तालुक्यतील पत्रकार बांधवाचा शाल, श्रीफळ आणि डायरी, पेन देऊन सत्कार केला आहे. अध्यक्षीय भाषणात माजी आमदार केशवराव आंधळे म्हणाले की, वडवणी तालुका निर्मितीपासूनच तालुका निर्मितीचा संघर्ष असो किंवा त्यानंतर आजतागायत वडवणी तालुक्यातील भौतिक, आर्थिक, सामाजिक दृष्ट्या झालेला विकास असो एकंदरितच वडवणी तालुक्याच्या सर्वांगिण जडणघडणीमध्ये वडवणीतील पत्रकार बांधवांचे फार मोठे योगदान आहे. सर्वसामान्यांच्या व वंचितांच्या अडचणी सोडविण्यासाठी वडवणीतील पत्रकार बांधवांची लेखणी सातत्याने झिजते हा संपन्न पत्रकारितेचा वारसा याठिकाणी लाभला असून येथील पत्रकारिता ही सर्व संपन्नता प्राप्त अशी असल्याचे दिसून येते. तरी सर्व पत्रकार बांधवांचं याही पुढे असचं सहकार्य असावं व सर्वसामान्यांच्या प्रश्नाला वाचा फोडावी एवढेच या निमित्ताने अपेक्षा करतो असेही माजी आमदार केशवराव आंधळे यांनी सांगितले. यावेळी न.प. उपनगरध्यक्ष बन्शी मुंडे, पत्रकार अशोक निपटे यांची भाषणे झाली तर या कार्यक्रमाचे प्रस्ताविक सेवानिवृत्त शिक्षक मधुकर धस यांनी केले तर आभार आशिर्वाद ट्रेडर्सचे मालक तथा बाजार समितीचे संचालक रणजीत धस यांनी मानले.



### तर पत्रकारांनी पुढाकार घ्याव : मधुकर धस

सध्या बीड जिल्ह्यातील समाजिक स्वस्थ बिघडले आहे. जाती जातीत माणस विखुल्या सारखे वागत आहेत. राजकारणात देखील ढवळाढवळ झाली आहे. परंतु समाज म्हणून आणि माणुस म्हणुन हि गंभीर बाब आहे. समाजिक स्वस्थ बिघडले आहे. या समाजिक स्वस्थाला सुधारण्याचे काम आता पत्रकार म्हणून पत्रकारांनी हाती घ्यावे असं मत यावेळी सेवानिवृत्त आदर्श शिक्षक मधुकरराव धस • यांनी प्रस्ताविक करत आसताना विचार मांडले आहेत.